भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०३/२०१७

१) किरायाचा घर खाली कर यावादावरुन महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०५/०३/२०१७ चे १९.३० वां. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीला किरायाचे घर खाली कर असे म्हटले असता तिने माझे पती आल्यानंतर बोला म्हटल्यावर आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करुन हाताला, गळयाला पकडुन तसेच साडी फाडुन फिर्यादीचे मनाला लज्जा वाटेल अशी वर्तवणुक करुन विनयभंग केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

२) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०५/०३/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान यातील आरोपी क्र. १ हा ग्रामपंचायत चा रोड फोडत असता सार्वजनीक ठिकाणी फिर्यादीने आरोपी क्र. १ ला रोक केली असता आरोपी क्र. १ ने भांडण, फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन तुला मारुन टाकीण व आरोपी क्र. २ व ३ यांनी संगनमत करुन मारण्यास धावुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने नारद सखाराम गायधने वय ४० वर्ष, रा. पोहरा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

३) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०५/०३/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान यातील सरतर्फे फिर्यादी पोउपनी. गेडाम पोस्टे मोहाडी हे आपले स्टॉपसह पेट्रोलीग करीत असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल वाकडी तिकडी दारु पिवुन दारुचे नशेत मिळुन आल्याने तो दारु पिवुन असल्याचे डॉक्टरी परीक्षण अहवाला वरुन पोस्टे मोहाडी येथे कलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

४) मोटार सायकल स्लीप झाल्याने डोक्याला मार लागुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक २४/०२/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील मृतक रोशन चितामन सेलोकर वय २१ वर्ष, रा. पालांदुर हा आपले मोटार सायकलने जात असतांनी मोटार सायकल ही स्लीप होवुन खाली पडुन डोक्याला मार लागुन जखमी झाल्याने त्यास चांडक हॉस्पीटल नागपुर येथे उपचारास भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे लकडगंज नागपुर येथुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. ग्रंथाळे पोस्टे पालांदुर यानी कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंन्डे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहे.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०५/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

06.3

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८४५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.